नाशिक
दि.०५/०३/२०२१

# प्रेसनोट

## आलोसे मनोज किसन नवाळे, तलाठी, सजा नायगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक यांना भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये शिक्षा झाले बाबत.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | सिन्नर पोलीस स्टेशन, जि.नाशिक ग्रामीण गुरनं. ३०१७/२०१३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७,१३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे |
| आरोपींचे नांव व कार्यालय | मनोज किसन नवाळे, तलाठी, सजा नायगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक |
| मागणी कलेली लाचेची रक्कम | १३,०००/–रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १३,०००/–रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे आई व वडीलांनी ब्राम्हणवाडे शिवारात १० गुंठे शेती विकत घेतली होती. त्याबाबत महसुली रेकॉर्डला नोंद घेणेसाठी आलोसे मनोज किसन नवाळे, तलाठी, सजा नायगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे १३,०००/– रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती. तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दिनांक १४/८/२०१३ रोजी ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आलोसे मनोज किसन नवाळे यांनी तक्रारदार यांचेकडे १३,०००/– रुपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडून त्यांचे विरुध्द सिन्नर पोलीस स्टेशन गुरनं. ३०१७/२०१३ भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा सन १९८८ चे कलम ७,१३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे दिनांक १५/८/२०१३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करुन मा. नाशिक न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्यात आले होते.<br>सदर खटल्याचा आज दिनांक ०५/०३/२०२१ रोजी मा श्रीमती एस.एस. नायर, अति. जिल्हा व सत्र न्यायधिश, जिल्हा न्यायालय नाशिक यांनी निकाल दिला असून त्यात **आलोसे मनोज किसन नवाळे** यांना भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा **कलम ७ प्रमाणे** – ५ वर्षे सक्त मजूरी व १०,०००/–रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिने कारावासाची शिक्षा तसेच **कलम १३(२) प्रमाणे** – ५ वर्षे सक्त मजूरी व १०,०००/–रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिने कारावासाची शिक्षा सुनावलेली आहे. सदर खटल्याचे कामकाज सरकारपक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री. कडवे यांनी पाहिलेले आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्यशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक कार्यालय
संकेतस्थळ : acbmaharashtra.gov.in
ई–मेल : spacbnasik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : acbmaharastra.net
टोल फ्री क. : १०६४
दुरध्वनी क. : ०२५३–२५७५६२८, २५७८२३०
व्हॉटस ॲप क. : ९९३०९९७७००

Vadhav 5.3.2021

( विजय जाधव )
वाचक पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक